14 FEB 2018

जा.क्र. पोआअ / पशा-4 / कुशन (अपोस्ट्री) वार्षिक दरकरार / 1584 / 2018 अमरावती शहर दिनांक / 02 / 2018

विषय :- पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवरील एकुण 236 पोलीस मोटार वाहनांचे कुशनिंगची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करण्याकरिता दोन लिफाफा पध्दतीनुसार दरपत्रके सादर करणे बाबत.

उपरोक्त संदर्भ व विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, पोलीस आयुक्त अमरावती शहर आस्थापनेवर 141 चार चाकी व 95 मोटार सायकल वाहने असे एकुण 236 मोटार वाहनांचे कुशनिंगची कामे करण्याकरिता वार्षिक दरकरार करावयाचा असल्याने दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

तरी ईच्छुक कुशनिंगची (अपोस्ट्री) कामे करणाऱ्या दुकानदारांनी त्यांची दोन लिफाफा पध्दतीनुसार सिलबंद दरपत्रके या कार्यालयातील पत्रव्यवहार शाखेत दिनांक 21 / 02 / 2018 ला 12.00 वाजेपर्यंत (शासकीय सुटी वगळून) सादर करावीत.

पहिला लिफाफा हा तांत्रिक लिफाफा म्हणून (लिफाफा-1) व दुसरा लिफाफा (लिफाफा-2 दरपत्रक) असे दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रके सादर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा-1 मध्ये खालील नमुद केलेले कागदपत्रे आढळुन आल्यानंतरच दरपत्रकाचा दुसरा लिफाफा उघडण्यात येईल याची कृपया निविदाधारकांनी नोंद घ्यावी.

लिफाफा क्रमांक-1 तांत्रिक लिफाफामध्ये खालील नमुद कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

1. दुकानाचे नोंदणी प्रमाणपत्राची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
2. पॅन कार्डचीस्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
3. आधार कार्डची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.
4. यापुर्वी राज्य शासन / केंद्र शासनाशी दरकरार केला असल्यास अनुभव प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
5. जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची स्वतः प्रमाणीत केलेली (Self Attest) प्रत.

पोलीस मोटार वाहनांचे कुशनिंगची कामे कामे करण्याकरिता प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक 22.02.2018 चे 12.00 वा. उघडण्यात येईल. यामध्ये काही बदल झाल्यास संबंधीतांना दुरध्वनीव्दारे / ई-मेलव्दारे सूचीत करण्यात येईल.

लिफाफा क्रमांक-02 दरपत्रकाच्या लिफाफामध्ये करावयाच्या कामाचे स्वतंत्रपणे दर नमुद करुन दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे.

पोलीस मोटार वाहनांचे कुशनिंग (अपोस्ट्री) कामाचे अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-

1. कुशनिंग (अपोस्ट्री) कामाचे दर अधिकृत सर्व्हिसिंग सेंटर पेक्षा जास्त नसावे.
2. पोलीस मोटार वाहनांचे कामाला प्रथम प्राधान्य द्यावे लागेल व त्वरीत प्रभावाने कामे करावे लागेल.
3. कुशनिंग (अपोस्ट्री) केलेल्या कामात दोष निर्माण झाल्यास त्याचे विनामुल्य निराकरण करुन देणे दुकानदारांना बंधनकरारक राहील.
4. कुशनिंग (अपोस्ट्री) कामाचे दरामध्ये सर्व कर समाविष्ट करावे लागेल व त्याप्रमाणे दर सुची दयावी लागेल.
5. कुशनिंग (अपोस्ट्री) कामात बेसिक डिस्काउंट देय असल्यास % चा उल्लेख करावा लागेल.
6. निविदा मंजुरी नंतर आदेश पारीत केल्यानंतर रुपये 100/- चे मुद्रांक शुल्कावर करारनामा करुन दयावा लागेल.
7. देयकाची रक्कम CMP व्दारे प्रदान करण्यात येईल त्यामुळे CMP करिता लागणारे दस्ताऐवज सादर करावे लागेल.

सदरचे पत्र हे या कार्यालयाचे cp.amravati@mahapolice.gov.in या संकेतस्थळावर सुध्दा अपलोड करण्यात आलेले आहेत. प्राप्त निविदापैकी निविदा स्विकृत करण्याचा / नाकारण्याचा अंतिम अधिकार पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी राखुन ठेवलेला आहे.

(प्रदिप चव्हाण )
पोलीस उपायुक्त (मुख्यालय)
अमरावती शहर

प्रति, ---------------------------------------------------------------------------

प्रत,

पोउपनि, सायबर सेल,
2/- उपरोक्त पत्र हे या कार्यालयाचे संकेतस्थळावर अपलोड करुन पुर्तता अहवाल सादर करावा.

# दरपत्रक

| अ.क्र. | वाहनाचा प्रकार व कामाचे विवरण | दर |
|---|---|---|
| 01 | समोरील सिट व टेके मागील सिट व टेका इम्पोर्टेड वेलवेट कापड फोम रेगझीन कव्हर 25 mm न्यु फोम शिट कंपलीट मटेरिअल व फिटीग लेबर चार्जेस सहीत. | |
| 02 | चार फाटक, दोन पायाजवळचे मागील तक्ता साईड पट्या नविन प्लायवुड वेलवेट फोम रेगझीन कंपलीट लेबर सहित. | |
| 03 | आतील वन पीस सिलींग इम्पोर्टेड वेलवेट कापड साईड पट्या सोलुशन पी.व्ही.सी. थरमाकोल सिट ड्रेस हँगर कंपलीट. | |
| 04 | मागील दोन दरवाजे व मागील काचाला परदे रॉड वायर हूक कंपलीट कापडासहित लेबर मटेरियल सहीत चार्जेस. | |
| 05 | समोरील काचाला पट्टी व संपुर्ण काचाला सन संट्रोल फिल्म कंपलीट मटेरियल सहित फिटींग चार्जेस | |
| 06 | रेडीमेट वेलवेट कुशन लेबर मटेरियलसह चार्जेस. | |
| 07 | मागील सिट करिता 12 mm प्लायवुड फिटींग करणे कंपलीट मटेरीयसहीत फिटींग सहीत लेबर चार्जेससह. | |
| 08 | समारील सिट व टेके मागील सिट व टेके कॉटन कव्हर कापड लेबर मटेरीयल सहीत चार्जेस. | |
| 09 | संपुर्ण सिट व टेके, हेडरेस्ट इंपोर्टे फोन रेगझीन कव्हर कंपलीट मटेरीयल सहीत 20 MM स्पंच लेबर मटेरीयल सहीत चार्जेस. | |
| 10 | 5 टन वाहनांचे साईडचे दोन्ही बाजुचे साईड पडदे मटेरियल सहीत चार्जेस. | |
| 11 | समोरील व मागील सिट करिता लागणारे 2 इंच यु फोम सिट लेबर चार्जेस सह | |
| 12 | समोरील व मागील सिट करिता लागणारे 1 इंच यु फोम सिट लेबर चार्जेस सह | |
| 13 | रेग्झीन कव्हर 1 इंची स्पंच समोरील सिट करिता प्रती नग लेबर मटेरियलसह चार्जेस. | |
| 14 | बॉम्बे डाईंग टरकिज कापड सिट कव्हर मटेरियल व लेबर चार्जेस सह | |
| 15 | मोटार सायकल वाहनांचे फोम लेदर सिट कव्हर नविन फिटींग करने मजुरी व मटेरीयल सहीत. | |
| 16 | मोटार सायकल वाहनांचे कापडी कव्हर नविन फिटींग करने मजुरी व मटेरीयल सहीत. | |
| 17 | मोटार सायकल वाहनाची साईड डिक्की | |

सही

पुरवठादार / दुरुस्तीकाराचे नांव